गीत रामायण

काही ठळक वैशिष्ट्ये

❑ 'गीत रामायण' ही संगीतिका १९५५ साली पुणे नभोवाणी केंद्रावरून प्रसारित करण्यात आली. ही संगीतिका सादर करण्याची मूळ कल्पना पुणे नभोवाणी केंद्रावरील सर्वश्री सीताकांत लाड व कृ. द. दीक्षित या दोन कल्पक व कर्तबगार अधिकाऱ्यांची होती.

❑ १ एप्रिल १९५५ रोजी रामनवमी होती. या पुण्य दिवशी 'गीत रामायणा'चा पहिला झंकार निनादला. तदनंतर दर आठवड्यास एक नवीन गीत प्रसारित होऊ लागले. प्रत्येक गीत आठवड्यातून तीन वेळा वाजविले जाई. अशा प्रकारे एकंदरीत ५६ गीतांची एक मालिका पुणे नभोवाणी केंद्रावरून वर्षभर प्रसारित करण्यात आली.

❑ 'गीत रामायणा'ची संगीत रचना करताना बाबुजींना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागले. बऱ्याच वेळा गाणे फार उशिरा हातात येत असे. त्यामुळे गाण्याची चाल बसवून त्याची तालीम घेऊन, ते गाणे प्रक्षेपणाच्या वेळेपर्यंत तयार ठेवण्यात त्यांची मोठी धावपळ उडत असे. एकदा एक गीत ८.४५ वाजता प्रसारित होणार होते. ग. दि. माडगूळकरांकडून गीत हातात मिळाले तेव्हा ७.३० वाजले होते. ते गीत घेऊन रिक्षातून नभोवाणी केंद्रात पोचताच चालीची वादकांना कल्पना देऊन, अर्ध्या तासात गाणे बसवून ते ठरलेल्या वेळेवर प्रसारित केले. त्या गीतास उदंड लोकप्रियता मिळाली. त्या गीताचे शब्द होते 'दैवजात दुःखे भरता दोष ना कुणाचा, पराधीन आहे जगती पुत्र मानवाचा'.

❑ 'गीत रामायणा'त काव्य-संगीत व गायन यांची पूर्ण एकरूपता झालेली आहे. 'गीत रामायण' स्वरबद्ध करताना बाबुजींनी मांड, पिलू, पहाडी, यमन, बागेश्री यासारख्या सहज परिचित सोप्या स्वरावलींबरोबर सोहनी, मुलतानी, केदार इ. रागांची मदत घेतली आहे. वीरश्रीयुक्त, कोमल, शांतरसाची, आनंदी, दुःखपूर्ण, निर्भर्त्सनापूर्ण अशा अनेक गीतांना अनुकूल असा स्वरसाज चढविण्यात बाबुजी पूर्ण यशस्वी झाले आहेत. गीत रामायणाच्या संगीतरचनेविषयी बाबुजी म्हणतात की, "गीत समोर आलं, वाचलं, पटकन अनुकूल राग स्वर सुचला नाही असं कधीच झालंच नाही. रामायणाच्या चाली आपोआप जमत गेल्या."

❑ 'गीत रामायणा'च्या जाहीर गायनाचा पहिला प्रयोग १९५८ साली पुण्याच्या नूतन मराठी विद्यालयात झाला. त्यानंतर मुंबईला शिवाजी मंदिर येथे ग. दि. माडगूळकर यांच्या सत्कार समारंभाच्यानिमित्त दुसरा प्रयोग झाला. मुंबईत झालेल्या प्रयोगाच्या वेळी मिळालेल्या प्रचंड प्रतिसादामुळे बाबुजींनी 'गीत रामायण' गायनाचे जाहीर कार्यक्रम सतत करण्याचे ठरविले. १९५८ पासून 'गीत रामायण' गायनाचे जवळजवळ २,५०० जाहीर कार्यक्रम झाले.


❑ 'गीत रामायण' गायनाचे कार्यक्रम भारताखेरीज इंग्लंड, अमेरिका, ऑस्ट्रेलिया व मॉरीशस इ. देशांत झाले आहेत.

❑ 'गीत रामायणा'च्या उत्कृष्ट संगीत दिग्दर्शनाबद्दल व सुरेल गायनाबद्दल, द्वारका पीठाचे शंकराचार्य 'श्रीमद् जगद्गुरू सच्चिदानंद तीर्थस्वामी महाराज यांनी बाबुजींना 'स्वरश्री' ही पदवी देऊन सन्मानित केले.

❑ प्रसिद्ध संत श्री तुकडोजी महाराज यांच्या अखेरच्या अवस्थेत, त्यांनी बाबुजींच्या आवाजात 'गीत रामायण' ऐकण्याची इच्छा व्यक्त केली. बाबुजींनी स्वतः बॉम्बे हॉस्पिटलमध्ये जाऊन त्यांना 'गीत रामायण' ऐकविले.

❑ १९६८ सालच्या रामनवमीला एच.एम.व्ही.ने 'गीत रामायणा'तील सर्व गीते असलेला १० रेकॉर्डसचा एक संच काढला. या रेकॉर्डसवरील सर्व गाणी बाबुजींनी गायली आहेत. आत्तापर्यंत या रेकॉर्डसचा विक्रमी खप झाला असून अद्यापही त्याला बरीच मागणी आहे.

❑ आत्तापर्यंत 'गीत रामायण'चे कन्नड, हिंदी, तेलुगू, गुजराती, बंगाली, संस्कृत, मल्याळम, इंग्रजी, आसामी आदी भाषांत अनुवाद झाले आहेत व वेगवेगळ्या गायकांनी ते गायले आहेत.



१) स्वये श्री रामप्रभु ऐकती कुश लव रामायण गाती	सुधीर फडके, मालती पांडे, प्रमोदिनी देसाई
२) शरयू तीरावरी अयोध्या मनुनिर्मित नगरी	मंदाकिनी पांडे, प्रमोदिनी देसाई
३) उगा का काळीज माझे उले? पाहुनी वेलीवरची	ललिता फडके
४) उदास का तू? आवर वेडे नयनातील पाणी	बबनराव नावडीकर
५) दशरथा घे हे पायसदान, तुझ्या यज्ञि मी	सुधीर फडके
६) चैत्रमास त्यात शुद्ध... राम जन्मला ग सखी	सुमन माटे, कालिंदी केसरकर, उषा अत्रे, जानकी अय्यर
७) सावळा ग रामचंद्र माझ्या मांडीवर न्हातो	ललिता फडके
८) ज्येष्ठ तुझा पुत्र मला देई दशरथा, यज्ञ रक्षणास	राम फाटक
९) जोड झणि कार्मुका सोड रे सायका मार ही	राम फाटक
१०) चला राघवा चला पहाया जनकाची मिथिला	चंद्रकांत गोखले